# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**महत्वाचे**

क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/ 1110

दिनांक :- 13 MAY 2016

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अनुदानित पदवीका/पदवी संस्था.

विभाग प्रमुख, केमिकल टेक्नालॉजी/एम.बी.ए. / एम.सीए. पदवी व पदव्युत्तर पदवी

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे ई.बी.सी. अर्ज भरुन घेण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक :- टीईएम २०१५/प्र.क्र.२१९/तांशि ४ दिनांक ३१ मार्च २०१६.

२. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई येथे दिनांक १०/५/२०१६ रोजी आयोजित बैठकीतील सुचना.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासुन शासकीय व अनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागास लाभार्थी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० % प्रतिपुर्ती करण्याबाबत संदर्भ १ चे शासन निर्णयान्वये ठरविलेले आहे. तसेच तंत्रशिक्षण संचानालय, म.रा., मुंबई येथे दिनांक १०/५/२०१६ रोजी आयोजित बैठकीत सुध्दा तोंडी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम व थेट व्दितीय वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज आवश्यक कागदपत्रासह विहीत नमुन्यात दिनांक २५/०५/२०१६ पर्यत भरुन घ्यावे तसेच आपल्या स्तरावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संदर्भीय १ चे शासन निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार दिनांक ०४/०६/२०१६ पर्यंत तपासणी करुन ठेवावे. याबाबत लवकरच तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांचे संकेतस्थळावर ऑनलाईन लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल व त्याबाबत आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

**सहपत्रे :- सदंर्भ १ चा शासन निर्णय**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.